## दोषारोप

**नेवासा येथील न्याय दंडाधिकारी प्रथम वर्ग, न्यायालय क्र.१ यांचे न्यायालयात.**

**(मी श्रीमती. डॉ. पी. आर. सुगांवकर प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, नेवासा तुमचेवर दोषारोप ठेवत आहे की,)**

**आर.सी.सी.क्र.४५४/२०२२** **निशाणी - ३७**

**आरोपी :-**

**१. संजय उत्तम सरोदे,**
वय : ३८ वर्षे धंदा: मजुरी
रा : नांदुर शिकारी, ता.नेवासा, जि.अ.नगर.

**२. सनी रमेश नेटके,**
वय : २१ वर्षे धंदा: मजुरी

**३. उमेश भिमराज वाल्हेकर,**
वय : २१ वर्षे धंदा: नोकरी
दोघे रा : देवगांव, ता.नेवासा, जि.अ.नगर.

**दोषारोप :**

दि.०५.०१.२०२१ रोजी १८.३० वा. चे सुमारास फिर्यादी चे रहाते घरा समोर तुम्ही आरोपींनी आपसात संगनमताने फिर्यादीचे पती व फिर्यादीस तुम्ही आरोपी क्र.१ ते ३ ने तुमच्या हातातील लाकडी दांडयाने पाठीवर, हातावर व मांडयावर मारून जखमी केले त्यायोगे तुम्ही भा.दं.वी कलम ३२४ सह कलम ३४ प्रमाणे गुन्हा केला आहे.

उपरोक्त तारखेस, वेळी व ठिकाणी, तुम्ही आरोपींनी आपसात संगनमत करुन फिर्यादी व साक्षीदारास वाईट वाईट शिवीगाळ करुन त्याचा अपमान केला व त्याच्याकडून सार्वजनिक शांतता भंग होण्यास प्रोत्साहन दिल्याने तुम्ही भा.दं.वि. कलम ५०४ सह ३४ प्रमाणे गुन्हा केला आहे.

उपरोक्त तारखेस, वेळी व ठिकाणी, तुम्ही आरोपींनी आपआपसात संगनमत करुन पत संस्थेचे कर्ज भरून टाक, नाहीतर तुला जिवंत ठेवणार नाही, अशी जिवे मारण्याची धमकी दिल्याने तुम्ही भा.दं.वि. कलम ५०६ सह ३४ प्रमाणे गुन्हा केला आहे.

वरील नमुद गुन्हे हे या न्यायालयाच्या अधिकार क्षेत्रातील आहेत. त्यामुळे तुमच्या विरोधात उपरोक्त नमुद कलमावरून दोषारोप ठेवण्यात येतो.

(डॉ. पी.आर. सुगांवकर)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
न्यायालय क्र.१, नेवासा.

दिनांक :- २८.१०.२०२५

आरोपींना दोषारोप मधील मजकुर वाचून समजावून सांगण्यात आला.

(डॉ. पी.आर. सुगांवकर)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
न्यायालय क्र.१, नेवासा.

दिनांक :- २८.१०.२०२५